# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक**

**विषय: विद्यार्थी सुरक्षा विमा, विद्यार्थी कल्याण निधी, विद्यार्थी आरोग्य सेवा योजना, आपत्कालिन निधी, विद्यापीठ क्रीडा मंडळ व शारीरिक शिक्षण मंडळ निधी, नोंदणी शुल्क, संगणक शुल्क व विकास निधीतील विद्यापीठ हिस्सा ऑनलाईन पध्दतीने पाठविण्याच्या मुदतवाढीबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा ऑनलाईन पध्दतीने चलनाद्वारे दि. ११ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत भरण्याबाबत विद्यापीठ परिपत्रक क्र. १७/२०२२ दि. १९/०१/२०२२ अन्वये कळविण्यात आलेले होते. तथापी, काही महाविद्यालय/संस्था यांनी शुल्काची रक्कम अद्यापही भरलेली नाही.

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना पुनश्च कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालय/संस्थानी अद्यापही विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा ऑनलाईन पध्दतीने चलनाद्वारे भरला नसेल त्यांना **दि. २८ फेब्रुवारी, २०२२** पर्यंत भरण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे. ऑनलाईन प्रो–रेटा व इतर निधी संबंधी माहिती भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया BOD पोर्टल अंतर्गत दिली आहे. BOD login मध्ये 'प्रो–रेटा ऑनलाईन' हि लिंक वापरून सदरची माहिती भरण्यात यावी.

यापुढे याकरीता कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

उपकुलसचिव
**शैक्षणिक प्रवेश**

गणेशखिंड, पुणे – ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/६७६
दिनांक : १२/०२/२०२२

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :–**
मा. प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी सर्व संलग्नीत महाविद्यालये /मान्यताप्राप्त सर्व संस्था

E:/Desktop/Pro-Rata Circular2021

Scanned by CamScanner